# पाहिजेत

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय या कार्यालयाअंतर्गत शासन परिपत्रक क्र. मग्रारो-२०१०/प्र.क्र.७/मग्रारो-१०, दि. २६ डिसेंबर, २०१० अन्वये कंत्राटी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी तसेच कंत्राटी तांत्रिक सहाय्यक यांची भविष्यात रिक्त होणारी पदे कंत्राटी तत्वावर सेतू सुविधा केंद्र, पालघर यांचेमार्फत भरण्यासाठी पात्र उमेदवारांनी अर्जासह मुलाखतीसाठी दि. ०२/०१/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, पार्श्वनाथ ९, बिडको नाका, पालघर (प.), जि. पालघर येथे उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | शैक्षणिक व इतर पात्रता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (Assistant Programme Officer) | प्रतिक्षायादी करिता १० | MBA, MSW किंवा पदव्युत्तर पदवीधारक. कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. | रु. १४,०००/- व मोबाईल फोन खर्च ३००/- असे एकत्रित मानधन अदा करण्यात येईल. |
| २ | कंत्राटी तांत्रिक सहाय्यक | प्रतिक्षायादी करिता १० | सिव्हील इंजिनियार (पदविकाधारक)/कृषी अभियांत्रिकी पदवीधारक/कृषी पदवीधारक/वनक्षेत्रातील पदवीधारक कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. | रु. १४,०००/- व मोबाईल फोन खर्च ३००/- असे एकत्रित मानधन अदा करण्यात येईल. |

**निवड पध्दती :-**

१) जाहिरातीनुसार इच्छुक उमेदवारांची थेट मुलाखत (Walk-in-Interview) पध्दतीने पात्र उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना भविष्यातील रिक्त होणाऱ्या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल.

२) प्रतिक्षा यादीवर निवड केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त होणार नाही.

३) पात्र उमेदवार यांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर , दि. ०४/०१/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

४) सदर नेमणूक पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असून फक्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने देण्यात येईल.

५) सदर पदावरील उमेदवारांचे मानधन हे सेतू तथा सेवा पुरविणाऱ्या संस्थेमार्फत अदा केले जाईल.

६) सदर पदावर नेमणूक केलेल्या उमेदवाराला नेमणूक संपुष्टात आल्यानंतर त्यापुढे सदर पदावर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही किंवा शासन सेवेत समाविष्ट करुन घेण्याची मागणी करता येणार नाही किंवा त्यासाठी कोणत्याही न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार असणार नाही.

७) उमेदवाराची ज्या पदासाठी निवड केली जाईल, त्या पदावर व संबंधित ठिकाणी हजर होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

८) कंत्राटी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व कंत्राटी तांत्रिक अधिकारी यांच्या पद संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

९) गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांना पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यात कोठेही नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती नंतर बदली बाबतची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही.

१०) निवड प्रक्रिया कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा हक्क राखुन ठेवण्यात येत आहे.

MICROSONIC PERIPHERALS THANE

ठिकाण :- पालघर
दिनांक :-१९/१२/२०१७

संचालक,
सेतू सुविधा केंद्र, पालघर

| सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | **जिल्हाधिकारी कार्यालय,पालघर**<br>(महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) | रोजगाराची हमी, करु संपन्न भूमी ! |
|---|---|---|

पार्श्वनाथ ९, पहिला मजला, बिडको नाका, ता.पालघर, जिल्हा-पालघर पिनकोड-४०१४०४

| | |
|---|---|
| दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२९७२७१ | Email ID : nregapalghar@gmail.com |
| क्र.मगांराग्रारोहयो/आस्था/टे-१/जाहिरात तांअवसकाअ/२०१७/12036 | दिनांक : १२/१२/२०१७ |

**प्रति,**

**श्री. प्रविण माने,**

**प्रोप्रायटर मायक्रोसोनिक पेरिफेररल्स, मुंबई,**

**सेतु समिती.**

**विषय :महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत बाहयस्थ पध्दतीने सेवा नियुक्ती करणेबाबत.**

**संदर्भ :** शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो- २०१०/प्र.क्र. ७/ रोहयो-१० अ, दि. १६ डिसेंबर, २०१०

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यातय येते की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कंत्राटी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व कंत्राटी तांत्रीक सहाय्यक या पदांची भरती शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो- २०१०/प्र.क्र. ७/ रोहयो-१० अ, दि. १६ डिसेंबर, २०१० मधील मुद्या क्र. २ नुसार मनुष्यबळ उपलब्धतेसाठी जाहिरात, सेतु किंवा मनुष्यबळ पुरविण्याऱ्या संस्थेच्या नावे करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व कंत्राटी तांत्रीक सहाय्यक या पदाच्या भरतीकरीता जाहिरात आपल्या मार्फत प्रसिध्द करण्यात यावी.

मा. जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने दि. ०२/०१/२०१८ रोजी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व तांत्रिक अधिकारी या कंत्राटी पदासाठी असलेल्या इच्छुक उमेदवारांची थेट मुलाखत (Walk-in-Interview) घेण्यात येणार आहे. तरी सोबत जोडलेल्या जाहितीची प्रत आपणामार्फत दि. १९/१२/२०१७ च्या अगोदर प्रसिध्द करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

स्थळप्रतिवर मा. जिल्हाधिकारी सो. यांची सही असे

**जिल्हाधिकारी पालघर करीता**

**प्रत :- जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, NIC पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही साठी.**

२/- उपरोक्त जाहिरात सोबत जोडलेल्या मुसद्याप्रमाणे दिनांक १९/१२/२०१७ ते ०१/०१/२०१८ पर्यंत मा. जिल्हाधिकारी पालघर यांच्या www.collectorpalghar.in संकेतस्थळावर कृपया प्रसिध्द करण्यात यावी. संकेतस्थळावरील प्रसिध्दी बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

स्थळप्रतिवर मा. जिल्हाधिकारी सो. यांची सही असे

**जिल्हाधिकारी पालघर करीता**